ePaper
शिंदे गट विरुद्ध भाजप; भाजप आमदारांचा पोलीस ठाण्यात गोंधळ




| वर्ष - 6 | अंक - 258 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





www.mahaenews.com | रविवार | दि. 1 जानेवारी 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## ‘जॅकवेल कथित भ्रष्टाचार’ च्या लक्षवेधीला राज्य सरकारची

# ‘केराची टोपली’!

## पिंपरी-चिंचवडची बदनामी करण्याचा डाव उधळला, शहर राष्ट्रवादीसह विरोधी पक्षाच्या नेत्यांचे अपयश

।पिंपरी। ।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**भामा आसखेड प्रकल्पातून पिंपरी-चिंचवडवला पाणी पुरवठा करण्याबाबत उभारण्यात येणाऱ्या जॅकवेलच्या कामात ३० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असून, या कामाला स्थगिती द्यावी, अशी लक्षवेधी राष्ट्रवादीसह विरोधी पक्षाच्या नेत्यांनी हिवाळी अधिवेशनात लावली. मात्र, केवळ राजकीय हेतूने सदर आरोप करण्यात येत आहे, असे निरीक्षण नोंदवून लक्षवेधीला केराची टोपली दाखवली असल्याचे समोर आले आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने भामा आसखेड प्रकल्पातील जॅकवेलच्या उभारणीसाठी १२० कोटी रुपयांची निविदा असताना १५१ कोटी रुपयांना काम दिलेले आहे आणि यामध्ये ३० कोटी रुपयांची अनियमितता झाली आहे. तसेच, सदर काम मे. गोंडवाना कंपनीला दिले असून, सदरहू कंपनीने अमृत योजनेंतर्गत निकृष्ट दर्जाचे काम केल्याने मध्यप्रदेश व छत्तीसगडमध्ये कारवाई केली असून, याच कंत्राटदाराला पिंपरी-चिंचवड महापालिकेने कंत्राट दिले आहे, असा आक्षेप नोंदवत विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यामाध्यमातून शहरातील पदाधिकाऱ्यांनी हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी दाखल केली.

हिवाळी अधिवेशनाची शनिवारी सांगता झाली. शेवटच्या टप्प्यात या लक्षवेधीवर चर्चा होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, तसे झाले नाही. विरोधी पक्षाकडून केले आरोप आणि वस्तुस्थिती यामध्ये विपर्यास असून, आरोपांमध्ये तथ्य नसल्यामुळेच ही लक्षवेधी बाजूला ठेवली आहे, असे सांगण्यात येते.

### राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्याचे अपयश...

वास्तविक, पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीचे आमदार अण्णा बनसोडे यांनी ‘जॅकवेल कथित भ्रष्टाचार’ प्रकरणात हिवाळी अधिवेशनामध्ये आवाक्षर काढलेले नाही. याउलट, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे स्थानिक नेते राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या माध्यमातून ही लक्षवेधी लावणार होते. त्यासाठी पवार यांची संबंधितांनी भेटही घेतली. मात्र, अशाच प्रकारचा प्रकल्प पुणे महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची सत्ता असताना राबवण्यात आला होता. “पाण्यावरुन राजकारण करणे नाही..” अशी सडेतोड भूमिका अजित पवार यांनी घेतली. त्यामुळे भाजपाविरोधी गटाने थेट विधान परिषदेच्या सभापती डॉ. निलम गोऱ्हे आणि विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या यांच्यामाध्यमातून लक्षवेधी सूचना मांडली. त्याद्वारे पिंपरी-चिंचवडमधील कथित भ्रष्टाचाराची राज्यभरात चर्चा घडवून आणण्याची रणनिती आखण्यात आली. विशेष म्हणजे, शहराची बदनामी करुन त्याचे खापर भाजपावर फोडण्याची ही योजना होती, ही बाब राज्य सरकारच्या लक्षात आल्यामुळे सदर लक्षवेधीला ‘केराची टोपली’ दाखवण्यात आली, असे मंत्रालयातील सूत्रांकडून समजले. त्यामुळे शहर राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांचे अपयश पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहे.





# कोरेगाव-भीमा परिसरात कडेकोट बंदोबस्त!

## कोरेगाव-भीमा ऐतिहासिक स्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी 70 जणांना उपस्थित राहण्यास मनाई

**पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



कोरेगाव-भीमा ऐतिहासिक स्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी रविवारी (१ जानेवारी) होणारी गर्दी विचारात घेऊन पुणे पोलीस तसेच ग्रामीण पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. अभिवादनासाठी येणाऱ्या राज्यभरातील ७० कार्यकर्त्यांना कोरेगाव भीमा परिसरात येण्यास मनाई करण्यात आली आहे. समाजमाध्यमांवर आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करणाऱ्या चौघांना नोटीसही बजावण्यात आली आहे.

अभिवादन सोहळ्यासाठी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित राहतात. गर्दीमुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पुणे ग्रामीण, पुणे शहर तसेच पिंपरी-चिंचवड पोलिसांनी बंदोबस्त ठेवला आहे. ग्रामीण पोलिसांनी ठेवलेल्या बंदोबस्ताचा आढावा कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी शनिवारी (३१ डिसेंबर) यांनी घेतला. यावेळी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक अंकित गोयल उपस्थित होते.

गर्दीच्या व्यवस्थापनाची तसेच तपासणीची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. बंदोबस्ताची आखणी करण्यात आली आहे. परिसरातील गावांमध्ये शांतता समितीच्या बैठका घेण्यात आल्या आहेत.

गैरप्रकार रोखण्यासाठी पुणे तसेच राज्यातील ७० जणांना कलम १४४ अनुसार कोरेगाव-भीमा परिसरात येण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. आदेशाचा भंग केल्यास त्यांच्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे विशेष पोलीस महानिरीक्षक फुलारी यांनी सांगितले.

### समाजमाध्यमांवर लक्ष

अभिवादन सोहळ्याच्या अनुषंगाने पोलिसांनी समाजमाध्यमांवरील मजकुरावर बारकाईने लक्ष ठेवले आहे. पुणे पोलीस, ग्रामीण पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेकडून समाजमाध्यमांवर प्रसारित केल्या जाणाऱ्या मजकुरांवर लक्ष ठेवण्यात येणार आहे. आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करणाऱ्या चौघांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. या सोहळ्यासाठी येणाऱ्या अनुयानांनी पोलिसांना सहकार्य करून कार्यक्रम शांततेत पार पाडावा, असे आवाहन विशेष पोलीस महानिरीक्षक फुलारी यांनी केले आहे.

### बंदोबस्त असा..

कोरेगाव-भीमा ऐतिहासिक स्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी होणारी गर्दी विचारात घेऊन रविवारी पेरणे फाटा परिसरात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे एक हजार जवान, शीघ्र कृती दल, राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकड्या बंदोबस्तात राहणार आहेत. अभिवादन सोहळ्यात होणारी गर्दी विचारात घेऊन पेरणे फाटा परिसरात २४० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून या सोहळ्यावर ड्रोन कॅमेऱ्यांची नजर राहणार आहे.

### समाजमाध्यमावर नजर

ऐतिहासिक स्तंभ अभिवादन सोहळ्याच्या अनुषंगाने पोलिसांनी समाजमाध्यमावरील मजकुरांवर बारकाईने लक्ष ठेवले आहे. पुणे पोलीस, ग्रामीण पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेकडून समाजमाध्यमातून प्रसारित केल्या जाणाऱ्या मजकुरांवर लक्ष ठेवण्यात येणार आहे. आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करणाऱ्या चौघांना नोटिसा बजाविण्यात आल्या आहेत. या सोहळ्यासाठी येणाऱ्या अनुयानांनी पोलिसांना सहकार्य करुन कार्यक्रम शांततेत पार पाडावा, असे आवाहन विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी केले आहे.

### सीसीटीव्ही, ड्रोन कॅमेऱ्यांची नजर

कोरेगाव- भीमा ऐतिहासिक स्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी होणारी गर्दी विचारात घेऊन रविवारी पेरणे फाटा परिसरात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे एक हजार जवान, शीघ्र कृती दल, राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकड्या बंदोबस्तात राहणार आहेत. अभिवादन सोहळ्यात होणारी गर्दी विचारात घेऊन पेरणे फाटा परिसरात २४० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून या सोहळ्यावर ड्रोन कॅमेऱ्याची नजर राहणार आहे.

पोलीस महानिरीक्षक फुलारी यांनी केले आहे.

# डिसेंबरमध्ये झाकोळलेली थंडी जानेवारीत अवतरणार!

## देशासह महाराष्ट्रात बहुतांश भागांत तापमान सरासरीखाली

**। पुणे महाईन्यूज । प्रतिनिधी।**

कमी दाबाच्या क्षेत्रांमुळे निर्माण झालेली पावसाळी स्थिती आणि उत्तरेकडील वाऱ्यांचा प्रभाव नसल्याने थंडीसाठी हक्काच्या असणाऱ्या डिसेंबरमध्येच थंडी झाकोळली. मात्र, थंडीची ही कसर जानेवारीमध्ये भरून निघण्याची शक्यता आहे. देशासह महाराष्ट्राच्या बहुतांश भागात या महिन्यात रात्रीचे किमान तापमान सरासरीखाली राहणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने शनिवारी (३१ डिसेंबर) जाहीर केला. दिवसाचे कमाल तापमानही सरासरीखाली राहणार असल्याने उन्हाचा चटका कमी असेल.

दरवर्षीनुसार यंदाही डिसेंबरमध्ये राज्यात थंडीचा कडाका अधिक असेल, असा सुरुवातीचा अंदाज होता. मात्र, बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या चक्रीवादळामुळे थंडीवर परिणाम झाला. चक्रीवादळामुळे कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होऊन राज्यात पावसाळी स्थिती निर्माण झाली. बंगालच्या उपसागरासह अरबी समुद्रातूनही राज्याच्या दिशेने बाष्प आले.



परिणामी डिसेंबरमधील काही दिवस वगळता बहुतांश वेळेला राज्यातील रात्रीचे किमान तापमान बहुतांश वेळेला सरासरीच्या पुढेच राहिले. दिवसा निरभ्र आकाशाची स्थिती राहिल्याने दिवसाचे कमाल तापमान सरासरीपुढे जाऊन उन्हाचा चटका वाढला. त्यामुळे याच महिन्यात मुंबई परिसरात देशातील उच्चांकी तापमानाची नोंद झाली.

भारतीय हवामान विभागाने जानेवारी महिन्यातील तापमान आणि पावसाच्या प्रमाणाचा अंदाज शनिवारी जाहीर केला. त्यानुसार संपूर्ण भारतामध्ये या महिन्यात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज आहे. मध्य भारताचा बहुतांश भाग, पूर्व आणि उत्तर-पश्चिम भारतात जानेवारीमध्ये किमान तापमान सरासरीखाली राहण्याचा अंदाज आहे. दक्षिणेकडील राज्ये, पूर्वोत्तर भारतात बहुतांश ठिकाणी मात्र किमान तापमान सरासरीजवळ किंवा सरासरीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज आहे. महाराष्ट्रात उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील तापमान सरासरीखाली राहून या भागात थंडी राहणार आहे.

दक्षिण कोकणातील किमान तापमान सरासरीजवळ राहील. महाराष्ट्राच्या उर्वरित किनारपट्टीच्या भागात किमान तापमान काही प्रमाणात सरासरीपुढे राहण्याचा अंदाज आहे.

### नव्या वर्षाची सुरुवात गारव्याने

नाताळपासून वर्ष अखेरीपर्यंतचा थंडीचा कडाका यंदा जाणवला नसला, तरी २०२३ या नव्या वर्षाच्या सुरुवातीला राज्यात काही प्रमाणात गारवा निर्माण होणार आहे. सध्या उत्तरेकडील राज्यांत थंडीचा कडाका आणि धुक्याची स्थिती आहे. महाराष्ट्रात पुढील दोन-तीन दिवस तापमानात घट होऊन थंडी निर्माण होणार आहे. त्यानंतर तापमानात किंचित चढ-उतार होईल. सध्या राज्यात सर्वत्र किमान आणि कमाल तापमान सरासरीपुढे आहे. उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्रातच काही प्रमाणात गारवा आहे. शनिवारी पुणे येथे राज्यातील नीचांकी १३.२ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. त्या पाठोपाठ नाशिक, महाबळेश्वर, औरंगाबाद, अमरावती, गोंदिया आदी भागांत १४ अंशांपर्यंत तापमानाची नोंद झाली.

# महेश लांडगे आशेचा किरण!

## भाजपाचे ज्येष्ठ नेते मधु जोशी यांचे गौरवोद्गार : शहर भाजपातर्फे आमदार लांडगे यांचा सन्मान

**पिंपरी-चिंचवड । । महाईन्यूज ।**

भारतीय जनता पार्टीचे नेते म्हणून आमदार महेश लांडगे यांनी सुरूवातीला बैलगाडा शर्यतीचा लढा जिंकला आणि आता गावगाडा म्हणजे पिंपरी-चिंचवड शहरातील वर्षानुवर्षे प्रलंबित प्रश्न मार्गी लावत गावगाडाही यशस्वीपणे हाकत आहेत. आमदार लांडगे यांच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवडकरांसाठी स्थानिक नेतृत्वाचा आशेचा किरण दिसत आहे, असे गौरवोद्गार भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी नगरसेवक मधु जोशी यांनी काढले.

हिवाळी अधिवेशनामध्ये पिंपरी-चिंचवडमधील ४२ वर्षे प्रलंबित प्राधिकरण बांधितांच्या साडेबारा टक्के परतावा, १४ वर्षे प्रलंबित शास्तीकर पूर्णमाफी आणि सोसायटीधारकांच्या समस्यांसाठी पुण्यात धोरणात्मक बैठक घेण्याबाबतचे महत्त्वूपर्ण निर्णय झाले. यासाठी भाजपाचे शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडकरांची बाजू सक्षमपणे सभागृहात मांडली. याबद्दल शहर भाजपाच्या वतीने आमदार लांडगे यांचा नागरी सन्मान करण्यात आला. यावेळी आमदार उमा खापरे, प्रदेश चिटणीस अमित गोरखे, दक्षिण भारतीय आघाडीचे राजेश पिल्ले, माजी सत्तारूढ पक्षनेते एकनाथ पवार, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, युवा मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे, माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे, चंद्रकांत नखाते, कैलास कुटे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच, नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी राहुल जाधव, माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते, कैलास कुटे, सरचिटणीस राजू दुर्गे, विजय फुगे यांनी मनोगत व्यक्त केले.





मधू जोशी म्हणाले की, भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी चिंचवडच्या नागरिकांचे अत्यंत जिव्हाळ्याचे प्रश्न नागपुर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात मांडले. आधी बैलगाडा आता गावगडा लाईणीवर लावत आहेत. मला आठवतंय पिंपरी चिंचवड शहराला उपऱ्या नेतृत्वाचे शहर म्हणले जात होते. या शहराला कुठल्याच पक्षाचा नेता नव्हता. या सर्व पक्षांचे कार्यकर्ते खुप निष्टावंत होते. पण यांना सर्वांना बांधुन ठेवेल असे नेतृत्व नव्हते. म्हणुन आम्ही नेहमी म्हणायचो हे शहर उपऱ्या नेतृत्वाने शापित झाले आहे. येथे स्थानिक नेतृत्व नव्हते. ती एक खंत होती. ती आता दूर होत आहे. मला महेश लांडगे यांच्या रुपाने तो किरण दिसतोय. आमदार उमा खापरे म्हणाल्या की, शास्तीकराच्या ओझ्यामुळे पिंपरी-चिंचवडमधील नागरिक वैतागले होते. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आमदार लांडगे यांचे कौतूक केले. साडेबारा टक्के परताव्याचा विषयही मार्गी लागला. एकनाथ पवार म्हणाले की, शास्तीकर माफी हा पिंपरी-चिंचवड शहरासाठी अत्यंत महत्त्वाचा होता. २००८ पासून शास्तीकराचे बांडगुळ राष्ट्रवादी काँग्रेसने घातले होते. ते उठवण्याचे काम आमदार लांडगे यांनी केले होते. या प्रश्नावर आंदोलन करण्यास आम्ही सुरूवात केली.

> भाजपा परिवाराच्या वतीने केलेला हा सन्मान जबाबदारी वाढवणारा आहे. शहरातील प्रश्न मार्गी लागत आहेत, हे इथल्या भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांचे आणि कार्यकर्त्यांच्या एकत्रिक मेहनतीचे फलित आहे. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या मुद्यांवरच शहरातील महापालिका, विधानसभा आणि लोकसभा निवडणुका लढवल्या आहेत. मात्र, प्रश्न मार्गी भाजपामुळे लागले आहेत. ही बाब पिंपरी-चिंचवडकर कदापि विसरणार नाहीत.
>
> **- महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

त्यावेळी देवेंद्र फडणवीस पक्षाचे सरचिटणीस होते. ते आंदोलनाला शहरात आले होते. उपमुख्यमंत्री फडणवीस आणि आमदार लांडगे यांच्या माध्यमातून मोठं 'गिफ्ट' पिंपरी-चिंचवडकरांना मिळाले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे यांची केले, तर युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे यांनी आभार मानले.

# राजकारणासाठी महापुरुषांचा वापर हे दुर्दैवी!

## पहिल्या इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या समारोप्रसंगी विश्वास पाटील यांनी व्यक्त केली खंत

**भोसरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज या थोर महापुरुषांचा नावाचा वापर राजकारणासाठी केला जातो हे दुर्दैवी आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे कर्तृत्व एका जाती धर्मापुरते मर्यादित नाही ते विश्वव्यापी व्यक्तिमत्व आहे. त्यांना एका चित्रपट, एक मालिका, कादंबरी एवढ्या पुरते सामावून घेता येणार नाही, अशा भावना इंद्रायणी साहित्य परिषद आणि मोशी ग्रामस्थ यांच्या वतीने आयोजित केलेल्या पहिल्या इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या समारोप्रसंगी विश्वास पाटील यांची भानुदास तापकीर यांनी प्रकट मुलाखत घेतली.मोशी येथील यशवंतराव चव्हाण साहित्य नगरी, रवींद्रनाथ टागोर विचारपीठावर यावेळी संमेलनाचे अध्यक्ष कामगार नेते व माजी नगरसेवक अरुण बोऱ्हाडे, स्वागत अध्यक्ष संतोष बारणे तसेच कार्यकारीनी मंडळाचे अध्यक्ष संदीप तापकीर, इंद्रायणी साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. सीमा काळभोर, विकास कंद, सचिव रामभाऊ सासवडे, सहसचिव डॉ. ए. ए. मुलानी, कोषाध्यक्ष अलंकार हिंगे, सदस्य दादाभाऊ गावडे, श्रीहरी तापकीर, सुनील जाधव आदी उपस्थित होते.

यावेळी तापकीर यांनी विचारलेल्या प्रश्नांवर विश्वास पाटील यांनी उत्तर देताना सांगितले की, "पानिपत" या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार



मिळणे अपेक्षित होते. त्यामुळे सलग तीन वर्ष साहित्य अकादमी कडे शिफारस केली जायची. परंतु लेखकाचे वय कमी असल्यामुळे त्यावेळी मला पुरस्कार नाकारण्यात आला. नंतर "झाडाझडती" कादंबरी प्रसिद्ध झाल्यानंतर वयाच्या ३२ व्या वर्षी मला साहित्य अकादमी पारितोषिक मिळाले. या कादंबरीचे प्रकाशन इंदिरा गोस्वामी यांच्या हस्ते करण्यात आले.

आसाम मधील सामान्यांचे प्रश्न, तेथील प्रकल्पग्रस्तांचे ज्वलंत प्रश्न यात मांडले आहेत. पानिपत मुळे समाजामध्ये इतिहासाविषयी जागृती झाली असे मला वाटते. पानिपत प्रसिद्ध झाल्यानंतर आता दरवर्षी १४ जानेवारीला लाखो लोक त्या स्थळावर अभिवादन करण्यासाठी जमतात हा एका लेखणीचा विजय आहे असे मला वाटते. वाण्यांच्या चाळीतील मी सामान्य युवक ते मुंबई उपनगराचा जिल्हाधिकारी हा प्रवास मी "लस्ट टू लालबाग) या कादंबरीत मांडला आहे. "नागकेशर" ही तीस वर्षे मनात ठेवलेल्या जिवंत विषयाची कादंबरी आहे. तर "पांगिरा" या कादंबरीत शेतकऱ्यांनी केलेल्या कांदा विषयावरील आंदोलन त्यांचे प्रश्न यात मांडले आहेत.स्वागताध्यक्ष संतोष बारणे यांनी स्वागत केले. आभार कार्यकारणी मंडळाचे कार्यध्यक्ष सोपान खुडे यांनी मानले. पसायदानाने संमेलनाचा समारोप करण्यात आला.

### राजकारणासाठी छत्रपतींच्या नावाचा वापर...

**छत्रपती शिवाजी राजे यांचे वडील शहाजीराजे यांचा देखील इतिहास समजून घेतला पाहिजे. मी शासकीय सेवेत असताना तात्कालीन केंद्रीय मंत्री मोहन धारिया यांना व्हिएतनाम येथून शिष्टमंडळ भेटण्यास आले होते. या शिष्टमंडळास अनेक पर्यटन स्थळ दाखवण्यात आली. रात्री या शिष्टमंडळाने आम्हाला प्रश्न विचारला की, रायगड कोठे आहे ? म्हणजे ज्या दिग्गज अमेरिकेला अनेक वर्ष लढून छोट्याशा व्हिएतनाम देशाने युद्धामध्ये नमवले त्या देशातील नागरिकांना रायगड आणि छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आदर आहे. अमेरिका व्हिएतनामचे युद्ध हेच मुळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचा अभ्यास करून व्हिएतनामने जिंकले हा इतिहास आहे. आज भारतातील लाखो लोक पर्यटनासाठी दरवर्षी परदेशात जातात परंतु यातील किती लोकांनी रायगडाला भेट दिली हे**

## संपादकीय »

# कुटुंब डॉट कॉम : ‘कुटुंबा’ला पर्याय नाही!

***विया वर्षाचा हा अखेरचा दिवस. या सदरातील हा शेवटचा लेख. लेखमालेच्या केंद्रस्थानी होती ‘कुटुंब’ ही संकल्पना. ‘कुटुंब’ हा समाजरचनेतील एक महत्त्वाचा घटक.***

भारतीयांच्या भावविश्वात तर कुटुंब आणि कौटुंबिक जीवनाला महत्त्वाचं स्थान आहे. आज जगभरात लग्नसंस्थेला आणि कुटुंब व्यवस्थेला जे हादरे बसताना दिसताहेत त्या पार्श्वभूमीवर भारतीय कुटुंबव्यवस्था मात्र टिकून आहे. अर्थात आपल्याकडेही काही लक्षणीय बदल झाले आहेतच. काळाच्या ओघात ‘एकत्र कुटुंब’ पद्धती अनेकविध कारणांमुळे अव्यवहार्य होत गेली व नवरा, बायको आणि मुलं अशी ‘विभक्त’ कुटुंबं अस्तित्वात आली. पण हेही तितकंच खरं, या ‘विभक्त’ कुटुंब व्यवस्थेचं भवितव्यही आता, आजच्या तरुणाईच्या मानसिकतेवर ठरणार आहे. म्हणूनच या शेवटच्या लेखात तरुणाईसाठीच महत्त्वाचे असे काही मुद्दे पुनःश्च अधोरेखित करू इच्छितो.

१) लग्न हा जीवनाला सोपं बनविण्यासाठी केलेला प्रकार आहे. तो कोणाच्या गळ्यात बांधण्यासाठी केलेला नाही. जन्मभराच्या कामसौख्यासाठी, त्यातून निर्माण होणाऱ्या संततीची योग्य जोपासना करण्यासाठी, सुसंस्कारित भावी पिढी तयार करून त्यायोगे समाजस्वास्थ्य वृद्धिंगत होण्यासाठी ‘विवाह संस्था’ निर्माण केली गेली.

२) विवाह संस्था निसर्गनिर्मित नसली तरी ‘विवाहा’साठी निसर्गानंच माणसाला उद्युक्त केलं, असं म्हणता येईल. माणसाचं अपत्य पूर्णपणे स्वतंत्र व स्वावलंबी होण्यासाठी बरीच वर्षे लागतात. स्त्री व पुरुष या दोघांच्याही जपणुकीची त्याला गरज भासते. दोघांकडून ते अपत्य वेगवेगळे पण पूरक गुण उचलतं. हे ‘विवाहा’मुळेच शक्य होतं.

३) आजच्या गतिमान जीवनातील ताणतणाव, असुरक्षितता, अस्वस्थता... या साऱ्यांचे पडसाद विवाहसंस्थेवर उमटत आहेत व अनेक आव्हानं समोर उभी राहत आहेत. पण अशा सर्व ताण-तणावांवर उतारा ठरू शकणाऱ्या आणि स्त्री-पुरुष दोघांनाही स्वास्थ्य, समाधान देऊ शकणाऱ्या सुसंवादी, सशक्त सहजीवनाची आज अधिक निकड निर्माण झाली आहे.

४) आज जे ताण दिसताहेत ते कुटुंबव्यवस्थेचे दुष्परिणाम नव्हेत. उलट कुटुंब नावाचा भला थोरला ‘आधारवड’ तुटत जाण्याचे परिणाम आहेत. म्हणूनच ‘सहजीवना’ला अन् ‘कुटुंबा’ला पर्याय नाही .

५) आजच्या तरुणाईचं कुटुंबापेक्षा करिअरला प्राधान्य असलं तरी करिअर इतकीच ‘जीवनशैली’ही महत्त्वाची असते, हे विसरता कामा नये.

# भीमा कोरेगाव : सामाजिक एकतेचा विजयस्तंभ

कोरेगाव भीमा येथील लढाईच्या द्विशताब्दी सोहळ्यात झालेल्या वादग्रस्त घटनेपासून या ना त्या निमित्ताने या संदर्भातला इतिहास समोर मांडला जातो आहे. अलीकडेच हा ‘शौर्य दिन’ रद्द करा, अशी मागणी करनी सेनेने केलेली आहे. मुळात कोरेगाव भीमा येथील लढाईचा वासाहतिक संदर्भ नीट समजून घ्यायला हवा.

इ.स. १८१८ हे वर्ष आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये महत्त्वाचं मानलं जातं. या वर्षी पेशवाई संपुष्टात आली आणि ब्रिटिश साम्राज्यवादाने पुढचा टप्पा गाठला. या निर्णायक वळणावर भीमा कोरेगाव येथे झालेली लढाई ही पेशवे विरुद्ध ब्रिटिश अशी होती. यामध्ये अनेक महार सैनिक ब्रिटिशांच्या बाजूने, पेशव्यांच्या विरोधात लढले. जे धारातीर्थी पडले त्यांच्या स्मरणार्थ ब्रिटिशांनी स्तंभ उभारला. त्यावर सैनिकांची नावे कोरण्यात आली. या लढाईनंतर ब्रिटिशांची भारतावरील पकड अधिक दृढ झाली.

१८५७च्या उठावानंतर मात्र ब्रिटिश अधिक सावध झाले. त्यांची धोरणात्मक रणनीती बदलली. परिणामी महारांची सैन्यातील नियुक्ती ब्रिटिशांनी थांबवली. तेव्हा ब्रिटिशांसोबत युक्तिवाद करताना बाबासाहेब आंबेडकरांनी कोरेगाव भीमातील लढाईचा संदर्भ दिलेला आहे. महारांचे योगदान सुस्पष्टपणे अधोरेखित करतानाच बाबासाहेब हा लढा ब्राह्मण्यवादी पेशवाईच्या जातीय शोषणाच्या विरोधातला



लढा होता, असा युक्तिवाद करतात. येथे ते दोन पातळ्यांवर डावपेचात्मक आखणी करतात, असे दिसते. एका बाजूला ब्रिटिश साम्राज्यवादासोबत तह करत महारांच्या नियुक्तीचा, अस्तित्वाचा मुद्दा पुढे रेटतात, तर दुसरीकडे जातीय पेशवाईच्या विरोधातल्या लढ्याचे स्वरूप स्पष्ट करत दलितांची अस्मिता जागवत संघर्षांची वाट प्रशस्त करतात. भिक्षुकशाही आणि भांडवलशाही यांना प्रखरपणे विरोध करणारे बाबासाहेब ब्रिटिश साम्राज्यवादाच्या भांडवली रूपाशी व्यूहात्मक पातळीवर व्यवहार करत लढाई पुढे नेतात.

सामाजिक व्यवस्था, वासाहतिक संदर्भ आणि आंतरराष्ट्रीय परिस्थिती यांचे नेमके भान असल्याशिवाय यातली गुंतागुंत लक्षात येत नाही. उदाहरणार्थ, वेगळ्या अर्थाने हाच पेच १९३९ला महायुद्धाच्या सुरुवातीला निर्माण झालेला दिसतो. एकीकडे ब्रिटन, रशिया यांसारख्या साम्राज्यवादी शक्ती तर दुसऱ्या बाजूला इटली, जर्मनी, जपान या फॅसिस्ट शक्ती. ब्रिटिशांना युद्धात मदत करायची की नाही, असा प्रश्न काँग्रेसमोर उभा राहिला तेव्हा फॅसिस्टांची मदत घेऊन ब्रिटिश साम्राज्यवादाच्या विरोधात लढले पाहिजे अशी बोस यांची भूमिका होती, तर गांधी-नेहरू या दोहोंची भूमिका ब्रिटिश साम्राज्यवादाशी सशर्त तह करत विरोध करण्याची होती. फॅसिझम हा साम्राज्यवादाहून भीषण, नृशंस आहे, असे त्यांचे आकलन होते.


कोरेगाव भीमामधील संघर्ष ब्रिटिश साम्राज्यवाद विरुद्ध ब्राम्हण्यवादी पेशवाई असा होता, तर दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीचा पेच साम्राज्यवाद विरुद्ध फॅसिझम असा होता. आंबेडकर, नेहरू आणि गांधी यांनी साम्राज्यवादाशी धोरणी पद्धतीने व्यवहार करत आपला लढा पुढे नेला. बाबासाहेबांनी कोरेगाव भीमाच्या हौतात्म्याचा अन्वय जातिअंताच्या लढाईशी जोडला. आम्ही दुहेरी तुरुंगात आहोत. पहिला तुरुंग जातीव्यवस्थेचा आणि दुसरा ब्रिटिश साम्राज्यवादाचा, असं ते सांगतात आणि दोन्हीतून बाहेर पडण्यासाठी राजकीय मुत्सद्देगिरी करतात. इ.स. १८१८ मध्ये भारत हे राष्ट्र-राज्य उदयाला आलेले नव्हते. त्यामुळे राष्ट्रवादी अस्मितांच्या चष्म्यातून याकडे पाहण्याचा प्रश्नच नव्हता. मुळात भारताची राष्ट्र-राज्य म्हणून झालेली घडण हे वासाहतिक राजकीय प्रक्रियेचे फलित आहे. २०१४ ला सत्तारूढ झालेल्या मोदी सरकारचा पाया हिंदुत्ववादी राष्ट्रवादाचा आहे. हिंदुत्ववादाचा एक मुख्य टेकू मुस्लीमविरोध हा असला तरी ब्राह्मणवर्चस्व ही त्याची आधारभूत शिला आहे. कोरेगाव भीमातील शौर्य दिनाचा उत्सव हा केवळ महार अस्मितेचा गौरव नाही, तर तो ब्राह्मण्यवादी पेशवाईच्या पाडावाचीही आठवण करून देणारा आहे. तो मोदी सरकारच्या पायाभूत विचाराशीच विसंगत आहे. यामुळेच २०१८ साली याविषयी हेतूपुरस्सर वादंग निर्माण करण्यात आले. एल्गार परिषदेतील काही जणांवर देशविरोधी कारवाई करत असल्याचा ठपका ठेवत त्यांना तुरुंगात डांबण्यात आले. ते ‘शहरी नक्षलवादी’ आहेत, असा प्रचार केला गेला.

# ही वाट दूर जाते...

**आजच्या युगामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान हे प्रत्येकाच्या आयुष्याचे अविभाज्य अंग आहे. आपले शरीर, आपला परिसर, आपले घर, आपले व्यवहार, आपली जीवनशैली या सर्वांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान अंतर्भूत असते. शरीर तर चालते-बोलते, अत्यंत परिपूर्ण आणि अचंबित करणारे यंत्र! संपूर्णपणे रसायनांनी भरलेले, भौतिकशास्त्राच्या तत्त्वांवर चालणारे जैविक यंत्र! आजूबाजूचे पर्यावरण, अवकाश, प्राणी-पक्षी आणि इतर सृष्टीच्या चराचरात विज्ञान आहे.**

आजच्या युगामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान हे प्रत्येकाच्या आयुष्याचे अविभाज्य अंग आहे. आपले शरीर, आपला परिसर, आपले घर, आपले व्यवहार, आपली जीवनशैली या सर्वांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान अंतर्भूत असते. शरीर तर चालते-बोलते, अत्यंत परिपूर्ण आणि अचंबित करणारे यंत्र! संपूर्णपणे रसायनांनी भरलेले, भौतिकशास्त्राच्या तत्त्वांवर चालणारे जैविक यंत्र! आजूबाजूचे पर्यावरण, अवकाश, प्राणी-पक्षी आणि इतर सृष्टीच्या चराचरात विज्ञान आहे. नैसर्गिक विज्ञान समजून घेणे जसे महत्त्वाचे तसे विज्ञान आणि तंत्रज्ञानातील शोध समजून घेणेदेखील महत्त्वाचे आहे. त्या सर्वांचे आपल्या आयुष्यावर प्रभाव पडत असतात. या सदरातून वेगवेगळ्या वैज्ञानिक घटना आणि तंत्रज्ञान याविषयी आपण जाणून घेणार आहोत.

स्थलांतर हा निसर्गाचा एक स्थायीभाव आहे. बहुतांश सर्वच प्राणीमात्र अन्न, निवारा, प्रजनन यासाठी स्थलांतर करीत असतात. काही वेळा स्थलांतर इच्छेविरुद्ध किंवा



प्रतिकूल परिस्थितीमुळे नाईलाजास्तव करावे लागते. हवामान बदलाच्या गंभीर परिणामांमुळे विशेषतः पक्षी आणि प्राणी यांच्या स्थलांतरामध्ये बराच फरक पडला आहे. वैज्ञानिकदृष्ट्या याचा अभ्यास आपल्याला अनेक संकेत देत असतात. हे संकेत माणसाची आधुनिक जीवनशैली, शासनाचे विकास प्रकल्प यासाठी आपण प्राणी आणि त्यांच्या अधिवासाचा किती आणि कसा विचार करतो याविषयी चिंतन करायला लावणारे आहेत.

खेचर हरीण (ओडोकोइलियस हेमिओनस) हे पश्चिम-उत्तर अमेरिकेतील स्थानिक हरीण आहे. खेचराच्या कानासारखे मोठे कान असल्यामुळे त्याला हे नाव देण्यात आले आहे. ही हरणे रॉकी पर्वताच्या पूर्वेला उत्तर अमेरिकेतील बहुतेक भागांमध्ये आणि इडाहो आणि वायोमिंगपासून उत्तरेकडील रॉकी पर्वताच्या खोऱ्यांमध्ये आढळतात. या हरिणांच्या स्थलांतराविषयी अनेक संशोधकांना उत्सुकता असते.

हरीण 255 या मादीच्या विक्रमी स्थलांतराची माहिती देणारे भौगोलिक वर्णन संशोधकांनी प्रथमच प्रकाशित केले आहे. या कथेने अमेरिकन पश्चिमेकडील स्थलांतरित खेचर हरिणांच्या कळपांचे संरक्षण करण्यासाठी आव्हाने आणि संधी समोर आणल्या आहेत. हरीण 255 ही सामान्य खेचर हरीण नाही. तिची कहाणी 2016 च्या वसंत ऋतूमध्ये सुरू झाली. वायोमिंग विद्यापीठाच्या संशोधकांनी अमेरिकेच्या दक्षिण-मध्य भागात असलेल्या वायोमिंगच्या लाल वाळवंटात राज्यातील खेचर हरिणांच्या लोकसंख्येचा अभ्यास करताना प्रथम हरणाच्या या मादीला 255 क्रमांकाने कॉलर केले. यामधून या हरिणीच्या स्थलांतराविषयी नवनवीन माहिती मिळत आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)



# संघ मुख्यालय बॉम्बने उडवण्याची धमकी!

## पोलीस आयुक्तांसह सर्वच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संघ मुख्यालयाची सुरक्षा व्यवस्था वाढवली

**। नागपूर। महाईन्यूज ।**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयात बॉम्बस्फोट घडवण्याच्या धमकीचा दूरध्वनी एका अज्ञात व्यक्तीने पोलीस नियंत्रण कक्षाला केला. त्यामुळे एकच खळबळ उडाली. पोलीस आयुक्तांसह सर्वच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संघ मुख्यालयाची सुरक्षा व्यवस्था वाढवली. धमकी देणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, गेल्या महिन्यातसुद्धा सचिन कुलकर्णी नावाच्या महापारेषणच्या अभियंत्याने संघ मुख्यालयाला बॉम्बने उडविण्याची धमकी दिली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळी ११ च्या सुमारास पोलीस नियंत्रण कक्षाला निनावी दूरध्वनी आला. दूरध्वनी करणाऱ्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुख्यालयात बॉम्बस्फोट घडविणार असल्याची धमकी दिली. नियंत्रण कक्षाने लगेच पोलीस आयुक्तांसह सर्वच वरिष्ठांना माहिती दिली. क्युआरटी कमांडोसह पोलिसांच्या तुकड्या संघ मुख्यालयात पाठविण्यात आल्या. पोलीस उपायुक्त गोरख भामरे यांनी लगेच संघ मुख्यालय गाठले आणि सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. संघ मुख्यालयाला उडविण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीचा शोध पोलीस घेत आहेत.

सायबर क्राईमच्या माध्यमातून निनावी फोन करणाऱ्याचे शोध घेणे सुरू आहे. गेल्या महिन्यातच सचिन कुलकर्णी नावाच्या इसमाने संघ मुख्यालय उडविण्याची धमकी दिली होती. त्याला सक्करदरा पोलिसांनी अटक केली होती. यावेळीसुध्दा पोलिसांना अशाच प्रकारचा संशय आहे. त्यामुळे सरत्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी पोलीस विभागात खळबळ उडविण्यासाठीच कुणीतरी धमकी दिल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

### लवकरच अटक करण्यात येईल

**दरम्यान, संघ मुख्यालय उडविण्याची धमकीचा फोन पोलीस नियंत्रण कक्षाला आला होता. त्यामुळे पोलिसांनी मुख्यालयाची सुरक्षा वाढविली आहे. सायबर क्राईमच्या पथकाद्वारे फोन करणाऱ्या व्यक्तीचा शोध घेणे सुरू आहे. त्याला लवकरच अटक करण्यात येईल, अशी माहिती झोन ३ चे पोलीस उपायुक्त गोरख भामरे यांनी दिली आहे.**

# हे वर्ष कटू आणि गोड आठवणींचेः शिंदे

**। मुंबई । महाईन्यूज ।**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाच्या अनुषंगाने एक फेसबुक पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी सरत्या वर्षातल्या गोड आणि कटू आठवणींचा उल्लेख केला आहे. याच वर्षात एकनाथ शिंदे यांनी समर्थकांसह बंड करुन राज्यात नवीन सरकार स्थापन केलं. त्यामुळे ही पोस्ट चर्चेत आलीय.

परंतू, नववर्षाचे स्वागत करताना आपल्या उत्साहाचा, कृतीचा, आचाराचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणालाही त्रास होणार नाही याची एक सुज्ञ व सुजाण नागरिक म्हणून आपण सर्वांनी स्वतःहून काळजी घेणे आवश्यक आहे. पोलीस तसेच इतर सरकारी यंत्रणा त्यांचे कर्तव्य योग्य प्रकारे बजावतील यात मला तीळमात्र शंका नाही. आपण सर्वांनी सुद्धा त्यांना सहकार्य करणे गरजेचे आहे. चला तर मग, आपण सर्वजण मिळून सरणाऱ्या २०२२ सालास निरोप देत येणाऱ्या २०२३ या नववर्षाचे आनंदाने आणि उत्साहाने स्वागत करूया....अशा आशयाची पोस्ट एकनाथ शिंदे यांनी केली आहे. सध्या नवीन वर्षाचं जोरदार सेलिब्रेशन सुरु आहे. मागच्या दोन वर्षात कोरोनाचं संकट असल्याने नवीन वर्षाचा उत्साह साजरा करता आलेला नव्हता. यावेळी कोरोनाच मळभ हटलेलं आहे. त्यामुळे उत्साह जोमात आहे.

### एकनाथ शिंदेंची पोस्ट चर्चेत...

**गोड आणि कटू अशा अनेक संमिश्र क्षणांनी एकवटलेले २०२२ हे वर्ष आता सरत आलंय, तर दुसरीकडे नव्याने उभारी घेण्याची उत्तुंग स्वप्नं दाखवत येणारे. २०२३ साल आपल्याला खूणावत आहे. आपण सर्वजण येणाऱ्या नवीन वर्षात नवी स्वप्ने, नवी आशा, नव्या आकांक्षा, नवे संकल्प, नवी दिशा उरात बाळगून आहोत.**



# शिंदे गटात अस्वस्थता? अब्दुल सत्तारांच्या वक्तव्यामुळे खळबळ!

## आपल्याविरोधात रचण्यात आलेल्या कटात पक्षातील नेता सहभागी असू शकतो

**। मुंबई । महाईन्यूज ।**

मुख्यमंत्र्यांच्या घरात झालेल्या चर्चेतील गोष्टी बाहेर येत असल्याने कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी नाराजी जाहीर केली आहे. यासंबंधी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार केली असून चौकशीची मागणीही केली आहे. इतकंच नाही तर आपल्याविरोधात रचण्यात आलेल्या कटात पक्षातील नेता सहभागी असू शकतो असं सूचक विधानही त्यांनी 'एबीपी माझा'शी बोलताना केलं आहे. अब्दुल सत्तार यांच्या या दाव्यामुळे शिंदे गटात अंतर्गत कुरघोडी सुरु असल्याची चर्चा रंगली आहे.



"मी एक छोटा कार्यकर्ता आहे, मात्र यांनी संपूर्ण महाराष्ट्राला गिळलं असून यांच्या चौकशा झाल्या तर भुई पळता थोडी होईल," असं अब्दुल सत्तार विरोधकांना उद्धेशून म्हणाले. "मुख्यमंत्र्यांकडे सर्वांचा डेटा जमा आहे. मुख्यमंत्री सभागृहात बोलले आहेत. मी तर आधीच टीईटीमध्ये एका कागदाचाही फायदा घेतला असेल तर फासावर लटकवा म्हटलं आहे. जोपर्यंत देव माझ्यासह आहे तोपर्यंत काही होणार नाही," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

"३२ वर्षांच्या तरुणाला हे सरकार घाबरलं' म्हणणाऱ्या आदित्य ठाकरेंना फडणवीसांचे प्रत्युत्तर; म्हणाले, "तुमच्या पुज्य पिताश्रींना..."

### विरोधी पक्षानीतल नेत्यांची खेळी असू शकते

**आमचे सर्व लोक एका जीवाचे, एका दिलाचे आहेत. अब्दुल सत्तार यांचा काहीतरी गैरसमज झालेला असू शकतो किंवा ही विरोधी पक्षानीतल नेत्यांची खेळी असू शकते, असा आरोप संजय गायकवाड यांनी केला. तरिही अब्दुल सत्तार यांचा कुणावर संशय असेल तर त्याचा माग मुख्यंत्री एकनाथ शिंदे घेतलीच. यात जर तथ्य असेल तर संबंधिताला योग्य ती समज दिली जाईल. "अब्दुल सत्तार यांचा खेळीमेळीचा स्वभाव आहे. ते २४ तास हसतमूख असतात. हिवाळी अधिवेशनात आम्हाला ते नाराज वाटले नाहीत", असे सांगत संजय गायकवाड यांनी आरोप फेटाळून लावले.**

दरम्यान त्यांच्याविरोधातील कटात कोण सहभागी आहे असं विचारलं असता ते म्हणाले "आमच्या पक्षातील असतील, काही हितचिंतक असतील किंवा विरोधी पक्षात ज्यांच्या खूर्च्या रिकाम्या झाल्या तेही असू शकतात".

यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या घरात झालेली चर्चा बाहेर येत असल्याचं सांगत नाराजी जाहीर केली. "आम्ही मुख्यमंत्र्यांच्या घरात चर्चा करत होतो. ती चर्चा बाहेर आली तेव्हा मी त्यांना चुकीच्या बातम्या बाहेर येत असल्याचं सांगितलं. मी कोणाचंही नाव घेतलं नाही. त्याचा तपास मुख्यमंत्री करणार आहेत. त्यांच्याकडे मी तक्रार केली आहे".

"विरोधी पक्षात माझे फार हितचिंतक आहेत. माझ्यासारख्या अल्पसंख्यांक समाजाच्या माणसाला इतकं महत्वपूर्ण खातं कसं दिलं याबद्दल काही लोकांच्या मनात खदखद आहे. पण ते त्याचं काम करतात मी माझं काम करतो," असं अब्दुल सत्तार यांनी सांगितलं.


यावेळी त्यांनी अजित पवारांच्या आरोपांना उत्तर देताना मी राष्ट्रवादी पक्षात आलो नाही याची चीड आहे का? अशी विचारणा केली.

# चीनप्रश्नी लष्कराचा राजकीय वापर!

## तवांग सेक्टरमध्ये चिनी सैनिकांच्या घुसखोरीच्या मुद्द्यावरून राहुल गांधींचे टीकास्त्र

।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

अरुणाचल प्रदेशातील तवांग सेक्टरमध्ये चिनी सैनिकांच्या घुसखोरीच्या मुद्द्यावरून शनिवारी काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर शरसंधान केले. ‘केंद्र सरकारचे चीन धोरण पूर्णपणे चुकले असून लष्करामागे लपून स्वत:च्या बचावाचा प्रयत्न होत आहे. लष्कराचा राजकीय वापरही केला जात आहे,’ असा गंभीर आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केला.चिनी घुसखोरीच्या मुद्द्यावरून संसदेच्या हिवाळी अधिवेशनामध्ये काँग्रेस आक्रमक झाला होता. काँग्रेसने हा मुद्दा धसास लावण्याचे ठरवले असून सातत्याने चीनच्या प्रश्नावर केंद्राला लक्ष्य बनवले जात आहे. ‘माझे वडील, माझी आजी दोघेही शहीद झाले. हे दु:ख भाजपला समजणार नाही, त्यांच्या कुटुंबातील कोणाचीही हत्या झालेली नाही. सीमेवर देशाच्या रक्षणासाठी तैनात प्रत्येक



जवानावर मी प्रेम करतो. त्यांच्यापैकी एकही शहीद होऊ नये, असे मला मनापासून वाटते. पण मी सरकारवर टिप्पणी केली तर, मी लष्कराविरोधात बोललो असल्याची दिशाभूल केली जाते,’ अशी टीका राहुल गांधी यांनी केली.

‘काँग्रेससह सर्व विरोधी पक्ष केंद्राच्या मदतीला धावतील, पण चिनी घुसखोरी झाल्याचे उघडपणे मान्य करून त्यांनी चुकांची कबुली दिली पाहिजे,’ असे ‘आवाहन’ राहुल गांधींनी केले. ‘घुसखोरी झाली नसल्याचा दावा केंद्राने केल्यामुळे चीनचे फावले. तुम्ही चीनला उघडे पाडा. त्यासाठी तुम्हाला लष्कराचे म्हणणे ऐकावे लागेल. चीन आणि पाकिस्तान एकत्र येऊन आपल्याविरोधात कुरापती करणार नाहीत, याची दक्षता परराष्ट्र धोरणात घेतली गेली होती.

### भाजप माझा गुरू!

भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे माझे ‘गुरू’ असून ते मला ‘मार्गदर्शन’ करत आहेत. काय करायचे नाही, याचे प्रशिक्षण त्यांच्यामुळे मला मिळते. त्यांनी माझ्याविरोधात आणखी आक्रमक झाले पाहिजे. ‘भारत जोडो’ यात्रा ही केवळ यात्रा असल्याचे मला वाटत होते, पण ही यात्रा लोकांचा आवाज बनली आहे, त्यांच्या भावनांचे प्रतीक ठरली आहे.

### बुलेटप्रूफ कारमधून पदयात्रा कशी होणार?

‘भारत जोडो’ ही पदयात्रा आहे, ती बुलेटप्रूफ कारमध्ये बसून कशी करणार, असा प्रश्न राहुल गांधी यांनी सुरक्षाकवच भंग केल्याच्या आरोपावर केला. कोणतेही कारण नसताना केंद्र सरकार माझ्याविरोधात ‘मुद्दा’ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. भाजपचे नेते रोड शो करतात तेव्हा नियम आड येत नाहीत का, असा सवाल करत यांनी करोनासंदर्भातील निर्बंधांच्या भूमिकेवर टीका केली.

### तरच लोकांचा विरोधकांना पाठिंबा!

देशभर लोकांमध्ये भाजपविरोधी वातावरण निर्माण होऊ लागले आहे. पण विरोधी पक्षांनी केवळ एकत्र येऊन भाजपचा पराभव होणार नाही. पर्यायी दृष्टिकोन दिला तरच लोक पाठिंबा देतील, असे राहुल गांधी म्हणाले. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांच्या ‘भारत जोडो’ यात्रेत सहभागी न होण्याच्या निर्णयावर, ‘द्वेष-हिंसेचे राजकारण अखिलेश वा मायावती यांनाही नको, काँग्रेस आणि विरोधी पक्षांच्या विचारांमध्ये समान धागा आहे. त्यांचा काँग्रेसला, त्यांना काँग्रेसचा पाठिंबा आहे. कदाचित काही राजकीय बंधनामुळे ते सहभागी होत नसावेत,’ अशी टिप्पणी राहुल गांधींनी केली.

# पॅलेस्टाईन-इस्रायल ठरावावर भारत तटस्थ

## अमेरिका आणि इस्रायलने ठरावाच्या विरोधात मतदान

।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

संयुक्त राष्ट्र : इस्रायलने पॅलेस्टाईनच्या भूभागाचा दीर्घकाळपर्यंत ठेवलेला ताबा आणि विलिनीकरणाच्या कायदेशीर परिणामांवर आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे मत मागण्याच्या संयुक्त राष्ट्र आमसभेतील ठरावावर भारत तटस्थ राहिला. अमेरिका आणि इस्रायलने ठरावाच्या विरोधात मतदान केले. भारतासह ब्राझील, जपान, म्यानमार, फ्रान्स आदी देश तटस्थ राहिले.



‘पूर्व जेरुसलेमसह इस्रायलव्याप्त पॅलेस्टिनी प्रदेशातील पॅलेस्टिनी नागरिकांच्या मानवी हक्कांवर परिणाम करणाऱ्या इस्रायली आचरणाची पद्धत’ या ठरावाचा मसुदा शुक्रवारी ८७ विरुद्ध २६ मतांनी मंजूर झाला. भारतासह ५३ देश तटस्थ राहिले.

या ठरावाद्वारे आंतरराष्ट्रीय न्यायालयास विनंतीचा निर्णय घेण्यात आला. १९६७ पासून पॅलेस्टिनींच्या भूप्रदेशावर इस्रायलचा ताबा, आक्रमणामुळे पॅलेस्टिनी नागरिकांच्या स्वयंनिर्णयाच्या अधिकारांच्या उल्लंघनाचे कायदेशीर परिणाम काय होतील, याबाबत सल्ला देण्याची विनंती या न्यायालयाला करण्यात येणार आहे.

तसेच जेरुसलेम या पवित्र शहराची लोकसंख्यानिहाय रचना, वैशिष्ट्ये व स्थिती बदल, येथे लागू केलेले पक्षपाती कायदे याबाबत कायदेशीर उपाययोजना सुचवण्याचीही विनंती करण्यात येणार आहे. त्याच बरोबर इस्रायलची धोरणे व कार्यपद्धतीमुळे येथील कायदेशीर ताब्याच्या वैधतेवर कोणते परिणाम होत आहेत, तसेच इतर देश व संयुक्त राष्ट्रांना यामुळे कोणत्या कायदेशीर परिणामांना तोंड द्यावे लागेल, याबाबतही न्यायालयाने सल्ला देण्याची विनंती या ठरावाद्वारे केली गेली आहे.

# जगात पहिल्यांदा न्यूझीलंडमध्ये नव्या वर्षाचं जल्लोषात स्वागत



।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारताआधी नव्या वर्षाचं स्वागत पूर्वेकडील देशात करण्यात आलं आहे. भारतीय प्रमाणवेळेपेक्षा साडेसात ते आठ तास पुढे असलेल्या देशांत नव्या वर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यात आलं आहे. या जल्लोषाचे व्हिडिओ ट्विटरवर व्हायरल झाले आहेत. फटाके वाजवत तेथील नागरिकांनी जल्लोष केला आहे.

दरम्यान, न्यूझीलंड आणि ऑकलंडमध्ये नव्या वर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यात आलं आहे. न्यूझीलंडमध्ये सध्या मध्यरात्रीचे १२ वाजून गेले आहेत. तर तेथील उंच टॉवरवरून फटाके फोडण्यात आले आहेत. तेथील प्रमाणवेळ भारतीय वेळेपेक्षा साडेसात ते आठ तास पुढे आहे.

# सरत्या वर्षानं दिला मोठा धडा! सईचा मोठा निर्णय



मराठी मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री सई ही नेहमीच तिच्या हटकेपणासाठी ओळखली जाते. गेल्या काही वर्षात सईनं बॉलीवूडमध्ये देखील आपल्या नावाची वेगळी मोहोर उमटवली आहे. तिला मीमी या चित्रपटातील भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीच्या पुरस्कारानं गौरविण्यात आले होते.

सई ही सोशल मीडियावर नेहमीच ॲक्टिव्ह असणारी सेलिब्रेटी म्हणून तिच्या चाहत्यांना माहिती आहे. तिला इंस्टावर फॉलो करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. नव्या वर्षाच्या स्वागताला आता सगळेजण तयार झाले आहेत. कित्येकांनी त्यादिवसासाठी वेगवेगळे प्लॅन केले आहेत. काहींनी नवे संकल्पही केले आहेत. यात मराठी मनोरंजन विश्वातील सेलिब्रेटीही मागे नाहीत.

सईनं देखील गेल्या वर्षाकडून आपल्याला काय शिकायला मिळाले आणि आपण नव्या वर्षात काय करणार आहोत याविषयी सांगितले आहे. सरत्या वर्षांत एक मोठी शिकवण आपल्याला मिळाली. त्याचा तिला

# माजी मुख्यमंत्र्यांच्या घरची सून होणार जान्हवी कपूर?



बॉलिवूड अभिनेत्री आणि श्रीदेवी यांची कन्या जान्हवी कपूरच्या अफेअरच्या चर्चांना उधाण आलं आहे. माजी मुख्यमंत्र्यांच्या नातवाला ती डेट करत असल्याचं दिसून आलं आहे. जान्हवी कपूर माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांच्या नातवाला शिखर पहाडिया याला डेट करत असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. गेल्या काही दिवसांपासून ते दोघे अनेक ठिकाणी एकत्र दिसत आहे. अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या साखरपुड्यातला एक व्हिडीओ व्हायरल होत आहे.जान्हवी आणि शिखरने एकत्रच या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. जान्हवीने गुलाबी रंगाची साडी नेसली आहे. त्या आधी अनिल कपूर यांच्या वाढदिवसाच्या निमित्तानेही हे दोघे एकत्र दिसले होते. शिवाय बोनी कपूर यांच्यासोबतही शिखरचा फोटो व्हायरल होत आहे.

# रितेश-जेनेलियाचा प्रेमात पाडणारा 'वेड'!

: मराठमोळा अभिनेता रितेश देशमुख आणि त्याची अभिनेत्री पत्नी जेनेलिया हे दोघेही सोशल मीडियावर चर्चेत असणारे सेलिब्रेटी. आपल्या चित्रपटाचे प्रमोशन कसे करावे याचे तंत्र त्या दोघांकडून शिकण्यासारखे आहे. यापूर्वी रितेशनं त्याच्या चित्रपटांचे दणक्यात प्रमोशन करुन प्रेक्षकांना आपली कलाकृती पाहण्यास भाग पाडले होते.काही दिवसांपूर्वी रितेशच्या वेड चित्रपटावरुन वाद सुरु झाला होता. त्याला कारण म्हणजे त्याच्या बाऊन्सरनं पत्रकारांशी वाद घातला होता. बॉलीवूडमध्ये वेगळी ओळख आणि नाव असणाऱ्या रितेशनं असं वागणं हे अनेकांना खटकलं होतं. जेनेलियाही सोशल मीडियावरुन ट्रोल करण्यात आले होते. यासगळ्यात रितेशनं माफी




# एका टर्निंग प्वाईंटमुळे रश्मिकाचं सगळं आयुष्यच बदललं



अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केलेल्या रश्मिका मंधानाच्या यशाची खूप रंजक कहाणी आहे.अभिनेत्री रश्मिका मंधाना हिने खूप कमी कालावधील चित्रपटसृष्टीत आपले नाव कमावले आहे. अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केलेल्या रश्मिका आता राष्ट्रीय क्रश बनली आहे.

रश्मिका मंधानाला नॅशनल क्रशचा टॅग का देण्यात आला आहे, हे तुम्हाला माहीत आहे का? तर त्याची देखील अनेक कारणे आहेत.रश्मिकाने प्रचंड कष्टाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. भारतासह जगभरात रश्मिकाचे लाखो चाहते आहेत. जाज आपण तिच्या यशाची कहाणी जाणून घेणार आहोत. विशेष म्हणजे तिला चित्रपट क्षेत्रातच यायचे नव्हते. परंतु, एक टर्निंग प्वाईंट मिळाला आणि तिचं सगळ आयुष्यच बदललं.

रश्मिकाला चित्रपटात नाही तर शैक्षणिक क्षेत्रात करियर करायचे होते. त्याचवेळी तिच्या एका शिक्षकाने फ्रेश फेससाठी तिचे नाव दिले. त्यानंतर नाविलाजाने रश्मिलाला स्पर्धेत सहभागी व्हावे लागले. याच्याच माध्यमातून तिने शीर्षक स्वतःच्या नावावर ठेवले आणि आपला पहिला चित्रपट देखील साइन केला.पहिला चित्रपट मिळाल्यानंतरही रश्मिकाला या क्षेत्रात आपण मागे पडेल असे वाटले.रश्मिका एका सामान्य कुटुंबातील आहे. अशा परिस्थितीत आपण अभ्यासाला खूप महत्त्व द्यावे असे तिला वाटत असे. परंतु, थोडंस वेगळं काही तरी केले तर नवीन अनुभव मिळेल असे तिला वाटले आणि तिने पहिल्या चितत्रपटात काम केले. विशेष म्हणजे तिचा पहिलाच चित्रपट चांगलाच गाजला.रश्मिकाचे आतापर्यंत अनेक चित्रपट प्रदर्शित झाले आहेत.

# नववर्षात भारतीय संघ बिझी!

## टीम इंडिया नवीन वर्षात श्रीलंका संघांचा करणार सामना; खेळाडूंसाठी अतिशय व्यस्त कार्यक्रम

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

नवीन वर्षात, टीम इंडिया आपली पहिली मालिका श्रीलंकेविरुद्ध खेळणार आहे. या मालिकेला टी-२० सामन्याने होणार आहे. दोन्ही संघातील पहिला टी-२० सामना ३ जानेवारी मुंबईत खेळला जाणार आहे. त्याचबरोबर वर्षाच्या शेवटी आशिया चषक २०२३ खेळला जाणार आहे. तसेच एकदिवसीय विश्वचषक स्पर्धाही नवीन वर्षात आयोजित करण्यात येणार आहेत. भारतीय क्रिकेटर्ससाठी हे वर्षही खूप व्यस्त असणार आहे. नवीन वर्षात भारतीय संघ श्रीलंकेविरुद्ध पहिली मालिका खेळणार आहे. ही भारतात होणारी मालिका आहे. ३ टी-२० सामन्यांच्या मालिकेनंतर तितक्याच एकदिवसीय सामने खेळवले जातील. या वर्षी एकदिवसीय विश्वचषक होणार असल्याने भारताचे लक्ष टी-२० पेक्षा एकदिवसीय मालिकेवर असेल. हा विश्वचषक फक्त भारतातच होणार आहे. जाणून घेऊया टीम इंडियाचे २०२३ सालचे वेळापत्रक...

एकदिवसीय विश्वचषक २०२३ –

यंदा भारतीय क्रिकेट संघाचे लक्ष वनडेवर असणार आहे. आशिया चषक देखील एकदिवसीय फॉर्मेटचा असेल आणि विश्वचषकही याच फॉरमॅटमध्ये होईल. गेल्या वर्षी आशिया चषक आणि विश्वचषक दोन्ही टी-२० फॉरमॅटमध्ये खेळले गेले होते. या दोन्हीमध्ये टीम इंडियाची कामगिरी चांगली नव्हती. भारताने पहिला एकदिवसीय विश्वचषक १९८३ मध्ये जिंकला होता, तर दुसरा २०११ मध्ये जिंकला होता. यावेळी संघ रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली तिसऱ्या विश्वचषकाच्या शोधात असेल. भारतात होणारा हा एकदिवसीय विश्वचषक ऑक्टोबर ते नोव्हेंबर दरम्यान खेळवला जाणार आहे.



### एप्रिलमध्ये आयपीएल 2023 चे आयोजन

**ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेनंतर इंडियन प्रीमियर लीग होणार आहे. आयपीएल १ एप्रिलपासून सुरू होऊ शकते, जे मे अखेरपर्यंत सुरू राहील. आयपीएलमधील १० संघांदरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत सर्व महत्त्वाचे खेळाडू सहभागी होणार आहेत.**

### आशिया कप 2023

**आशिया चषक या वर्षी होणार आहे, ही स्पर्धा पाकिस्तानमध्ये होणार असा अधिकृत निर्णय घेण्यात आला होता. मात्र, आशिया क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष जय शाह यांनी भारत पाकिस्तानमध्ये जाणार नसल्यामुळे आशिया चषक स्पर्धेचे ठिकाण बदलण्यात येणार असल्याची पुष्टी केली आहे. सप्टेंबरमध्ये होणारा आशिया चषक यावेळी वनडे फॉरमॅटमध्ये खेळवला जाणार आहे.**

### भारत विरुद्ध श्रीलंका टी-20 मालिका

- **पहिला सामना: ३ जानेवारी (मुंबई)**
- दुसरा सामना: ५ जानेवारी (पुणे)
- तिसरा सामना: ७ जानेवारी (राजकोट)
- **भारत विरुद्ध श्रीलंका वनडे मालिका**
- पहिला सामना: १० जानेवारी (गुवाहाटी)
- दुसरा सामना: १२ जानेवारी (कोलकाता)
- तिसरा सामना: १५ जानेवारी (त्रिवेंद्रम)
- **भारत विरुद्ध न्यूझीलंड वनडे मालिका**
- पहिला सामना: १८ जानेवारी (हैदराबाद)
- दुसरा सामना: २१ जानेवारी (रायपूर)
- तिसरा सामना: २४ जानेवारी (इंदौर)
- **भारत विरुद्ध न्यूझीलंड टी-२० मालिका**
- पहिला सामना: २७ जानेवारी (रांची)
- दुसरा सामना: २९ जानेवारी (लखनौ)
- तिसरा सामना: १ फेब्रुवारी (अहमदाबाद)
- **भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया कसोटी मालिका**
- पहिला सामना : ९ ते १३ फेब्रुवारी (नागपूर)
- दुसरा सामना: १७ ते २१ फेब्रुवारी (दिल्ली)
- तिसरा सामना: १ ते ५ मार्च (धर्मशाला)
- चौथा सामना: ९ ते १३ मार्च (अहमदाबाद)
- **भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया वनडे मालिका**
- पहिला सामना: १७ मार्च (मुंबई)
- दुसरा सामना: १९ मार्च (विशाखापट्टणम)
- तिसरा सामना: २२ मार्च (चेन्नई)

# महाराष्ट्राला आठव्यांदा दुहेरी मुकुट!

## राष्ट्रीय कुमार-मुली खो-खो स्पर्धा

**बन्सबेरिया । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्राच्या मुलींनी ओडिसाला, तर महाराष्ट्राच्या कुमारांनी दिल्लीला नमवून दुहेरी सुवर्णमय कामगिरी केली. महाराष्ट्राचा हा सलग आठवा दुहेरी मुकुट ठरला असून कुमारांचे ३३ वे, तर मुलींचे २४ वे अजिंक्यपद आहे.

उस्मानाबादचा किरण वसावे (वीर अभिमन्यू) व सोलापूरची प्रीती काळे (जानकी) हे या स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूच्या पुरस्काराचे मानकरी ठरले. पश्चिम बंगालमधील बन्सबेरिया (जि. होगळी) येथे राष्ट्रीय कुमार-मुली खो-खो स्पर्धा झाली.



मुलींच्या गटात महाराष्ट्राने ओडिसाचा १६-१० असा ६ गुणांनी धुव्वा उडवत रुबाबात अजिंक्यपदाला गवसणी घातली. महाराष्ट्रातर्फे प्रीती काळे (२.३०, २ मि. संरक्षण व ४ गुण), दीपाली राठोड (२.२०, २ मि. संरक्षण व २ गुण), संपदा मोरे (१.५०, २ मि. संरक्षण व ३ गुण), वृषाली भोये (३ गुण) यांच्यासह कर्णधार अश्विनी शिंदे (१.२०, २ मि. संरक्षण) यांनी विजयात बहारदार कामगिरी करत सलग विजेतेपदाचा धडाका कायम ठेवला. प्रीती काळेने पाचव्या गुणासाठी ओडिसाला चांगलेच झुंजवले.

कुमार गटाच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राने दिल्लीवर २२-१४ असा ८ गुणांनी विजय मिळवत दमदार कामगिरीची नोंद केली. किरण वसावे (१.५०, २.१० मि. संरक्षण व ३ गुण), सूरज झोरे (१.३०, १ मि. संरक्षण व ४ गुण), विवेक ब्राम्हणे

> (१.२० मी संरक्षण व ५ गुण), निखिल सोड्ये (१.४०, १.३० मि. संरक्षण), चेतन बिका (१.२० मी. संरक्षण व २ गुण) यांनी छान खेळ केला. पराभूत दिल्लीतर्फे मिरजुल (२ मी. संरक्षण व ९ गुण), दीपेंद्र (१,१.२० मी. संरक्षण) यांनी चुणूक दाखवली.
>
> **- डॉ. अमित**

खो-खो हा वेगवान खेळ म्हणून ओळखला जातो. लाल मातीमधील हा खेळ मॅट वरही आला. खेळाडूंना मैदानावर दुखापतींना सामोरे जावे लागत आहे. यासाठी महाराष्ट्र खो-खो संघटनेने संघाबरोबर फिजिओ नेमला आहे.सांगलीचे खो-खोपटू डॉ. अमित रावटे हे फिजोओचे काम उत्तमरीतीने बजावत आहेत. बन्सबेरिया येथील या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी देशभरातील अनेक खेळाडूंसाठी डॉ. अमित देवदूत बनले आहेत.